झोपडपट्टी पुनर्वसन प्राधिकरण, पुणे व पिंपरी चिंचवड क्षेत्र,
मुथ्था चेंबर्स, सेनापती बापट रोड, पुणे- १६.
जा.क्र.झोपुप्रा./सप्रा१/गुरुवार पेठ/७००/२०२३
दिनांक : २२ / ०८ /२०२३

# झोपडपट्टी पुनर्वसन आदेश

## ( झोपडपट्टी पुनर्वसन क्षेत्र घोषित करण्याची पूर्वसूचना )

महाराष्ट्र झोपडपट्टी (सुधारणा, निर्मुलन व पुनर्विकास) अधिनियम, १९७१ चे कलम ३ क अन्वये आदेश.

**प्रस्तावना –**

महाराष्ट्र झोपडपट्टी (सुधारणा, निर्मुलन व पुनर्विकास) अधिनियम, १९७१ (प्रस्तुत आदेशात या अधिनियमाचा उल्लेख यापुढे उक्त अधिनियम असा करणेत आला आहे) चे कलम ३अ नुसार महाराष्ट्र शासन, गृहनिर्माण विभाग, अधिसूचना क्र. झो.पु.यो.-२००४/ प्र.क्र.२१३/झोपसु-१, दि. ३०/०६/२००५ अन्वये पुणे व पिंपरी चिंचवड महानगरपालिका क्षेत्राकरिता झोपडपट्टी पुनर्वसन प्राधिकरण, पुणे या प्राधिकरणाची स्थापना करण्यात आलेली आहे;

झोपडपट्टी पुनर्वसन या प्राधिकरणाकडून उक्त अधिनियमाच्या कलम ३ब मधील तरतुदींनुसार पुणे व पिंपरी चिंचवड महानगरपालिकांच्या क्षेत्रासाठी सर्वसाधारण झोपडपट्टी पुनर्वसन योजना तयार करणेत आलेली असून शासनाच्या मान्यतेने सदरची सर्वसाधारण झोपडपट्टी पुनर्वसन योजना महाराष्ट्र शासनाच्या राजपत्रात दि.०१/१२/२००५ रोजी अंतिमत: प्रसिध्द करण्यात आलेली आहे;

(१) ज्याअर्थी, पुणे महानगरपालिका हद्दीतील खालील अनुसूचीमध्ये नमुद भवानी पेठ येथील सि.स.नं.२१९,२२०/१,२२०/२,२२०/३,२२०/४अ,२२०/४ब,२२१,२२२/अ,२२२/ब,२२३,२३३,२३४,तळईवस्ती, गुरुवार पेठ, पुणे या नावाने ओळखल्या जाणाऱ्या झोपडपट्टी क्षेत्रामधील (पुर्णत:) अंदाजे क्षेत्रफळ २७४५.४० चौ.मी. (प्रस्तुत जाहीर प्रकटनात या मिळकतीचा उल्लेख यापुढे सदर मिळकत असा करणेत येत आहे) सदर क्षेत्रावर झोपडपट्टी पुनर्वसन योजना राबविणेसाठी विकसक मे. सह्याद्री प्रोपटीज यांचेमार्फत झोपडपट्टी पुनर्वसन प्राधिकरणाकडे झोपडपट्टी पुनर्वसनाचा प्रस्ताव दि. ०५/०८/२०१७ रोजी सादर करणेत आलेला आहे आणि, सक्षम प्राधिकारी क्र.१, झो.पु.प्रा.,पुणे यांनी सदर प्रकरणात ७० % हून जास्त झोपडीधारकांचे संमतीपत्र प्राप्त असल्याचे प्रमाणीत केले आहे; आणि,

(२) ज्याअर्थी, अनुसूचीमध्ये नमूद केलेल्या मिळकतीवर झोपडपट्टी असलेने व त्रिमिती पद्धतीने परीगणनेनुसार तसेच प्रत्यक्ष जागेवरील मोजणी नुसार एकूण क्षेत्र २७४५.४० चौ.मी. असून सदर क्षेत्राचा झोपडपट्टी सदृश्य असल्याबाबतचा अहवाल उपआयुक्त, पुणे महानगर पालिका, पुणे यांचेकडील पत्र जा.क्र. उआ-५ / ६३३८, दि. ०१/१२/२०२२ अन्वये प्राप्त झालेला आहे; आणि,

(३) ज्याअर्थी, उक्त क्षेत्र तत्कालीन सक्षम प्राधिकारी पुणे व पिंपरी चिंचवड महानगरपालिका, पुणे यांनी सदरचे क्षेत्र महाराष्ट्र शासन राजपत्र दि.०८/१२/१९८३ पृष्ठ क्र. ३३१४ वर प्रसिद्ध अधिसूचनेद्वारे उक्त अधिनियमाच्या कलम ४(१) मधील तरतुदीनुसार झोपडपट्टी क्षेत्र म्हणून घोषित करीत आहे; आणि,

(४) ज्याअर्थी, अनुसूचीमध्ये निर्दिष्ट करण्यात आलेले क्षेत्र महाराष्ट्र झोपडपट्टी (सुधारणा, निर्मुलन व पुनर्विकास) सुधारित अधिनियम २०१७ चे कलम ३(क) नुसार झोपडपट्टी पुनर्वसन क्षेत्र म्हणून घोषित करणेकरीता मुख्य कार्यकारी अधिकारी,झो.पु.प्रा.,पुणे हे सक्षम आहेत,आणि,

(५) ज्याअर्थी, अनुसूचीमध्ये नमूद एकूण २७४५.४० चौ.मी. एवढे योजना क्षेत्र हे झोपडपट्टी पुनर्वसन क्षेत्र म्हणून घोषित करणेकामी समर्थनीय ठरणारी परिस्थिती अस्तित्वात असल्याबद्दल माझी खात्री झालेली आहे.

त्याअर्थी, मी नीलेश र. गटणे, मुख्य कार्यकारी अधिकारी, झोपुप्रा., पुणे उक्त अधिनियमाच्या कलम ३क मधील नमूद तरतूदीनुसार उक्त अधिनियमाच्या कलम ४(१) मधील तरतुदीमधील झोपडपट्टी क्षेत्र म्हणून घोषित करण्याचे प्रस्तावित करत आहे, आणि मला प्राप्त असलेल्या अधिकारानुसार खालील अनुसूचीमध्ये निर्दिष्ट करण्यात आलेले हे क्षेत्र या आदेशाद्वारे झोपडपट्टी पुनर्वसन क्षेत्र म्हणून प्रस्तावित करण्यासंदर्भात खालीलप्रमाणे आदेश पारित करत आहे .

आदेश :-

(१) या प्राथमिक आदेशाद्वारे मालकी हक्क प्राप्त असलेले खाजगी व्यक्ती / शासकीय विभाग / सार्वजनिक प्राधिकरणे / स्थानिक संस्था यांना असे सूचित करण्यात येते की, त्यानी उक्त क्षेत्र पुनर्वसन क्षेत्र म्हणून घोषित करणेबाबत त्यांची कोणतीही सूचना /आक्षेप/ हरकत असल्यास, ती सदरचा आदेश प्रसिद्ध करण्यात आल्याच्या दिनांकापासून ३० दिवसांचे आत मुख्य कार्यकारी अधिकारी,झोपडपट्टी पुनर्वसन प्राधिकरण, पुणे व पिंपरी चिंचवड क्षेत्र, पुणे - १६ यांचे कार्यालयात कार्यालयीन वेळेत लेखी स्वरुपात आवश्यक ती कागदपत्रे आणि पुराव्यांसह सादर करावी. विहीत मुदतीनंतर प्राप्त होणारे आणि सबळ पुराव्याशिवाय दाखल केलेले कोणतेही आक्षेप / हरकती / सूचना / दावे या कार्यालयाकडे स्विकारले जाणार नाहीत अथवा विचारात घेतले जाणार नाहीत याची जाणीव याद्वारे करून देण्यात येत आहे.

(२) सदरच्या आदेशामुळे व्यथित होणाऱ्या व्यक्तीस, उक्त विहीत मुदतीत मालकी हक्क प्राप्त असलेल्या खाजगी व्यक्ती / शासकिय विभाग / सार्वजनिक प्राधिकरणे / स्थानिक संस्था यांचेकडून प्राप्त आक्षेप / हरकती / सूचना / दावे यावर त्यांना म्हणणे मांडण्याची वाजवी संधी देण्यात येईल. त्यांचे म्हणणे व दाखल केलेले कागदपत्र आणि पुरावे विचारात घेऊन उक्त अधिनियमाच्या कलम ३क (१) अन्वये सदरचा आदेश कायम करण्याबाबत व अधिसूचनेमध्ये समाविष्ट क्षेत्र झोपडपट्टी पुनर्वसन क्षेत्र म्हणून अंतिमत: घोषित करण्याबाबत निर्णय घेण्यात येईल. असा निर्णय मा.उच्च स्तरीय तक्रार निवारण समिती, बांद्रे, मुंबई यांच्याकडे दाखल त्यावरील कोणत्याही अपिलातील निर्णयास अधिन राहुन अंतिम असेल.

## अनुसूची

**झोपडपट्टीचे नाव : सि. स.नं. २१९, २२०/१, २२०/२, २२०/३, २२०/४अ, २२०/४ब, २२१, २२२/अ, २२२/ब, २२३,२३३,२३४, तळई वस्ती, गुरुवार पेठ, पुणे**

**महानगरपालिका क्षेत्र : पुणे महानगरपालिका.**

| गाव | स.नं./ सि.स.नं. | जमीनी भोगवटदाराचे हक्क प्राप्त असलेल्या संस्थेचे नाव | क्षेत्र (चौ.मी.) (त्रिमीती पद्धतीने प्रत्यक्ष जागेवरील मोजणी नुसार) | चतु:सिमा |
|---|---|---|---|---|
| १ | २ | ३ | ४ | ५ |
| गुरुवार पेठ , पुणे | २१९,२२०/१,२२०/२ ,२२०/३,२२०/४अ, २२०/४ब,२२१,२२२/अ,२२२/ब,२२३,२३३ २३४ | पुणे महानगर पालिका | २७४५.४० चौ.मी. | **पुर्वेस** - लागू रस्ता |
| | | | | **पश्चिमेस** - लागू बोळ व लागू सि. स. नं. १५अ |
| | | | | **दक्षिणेस** - लागू बोळ व लागू सि. स. नं. २३२ व सि. स. नं. २२४ |
| | | | | **उत्तरेस** - लागू सि. स. नं. २१४ व लागू सि. स. नं. २१५ व लागू सि. स. नं. २१८ |

सदरचा आदेश हा माझे सहीने व कार्यालयाच्या शिक्क्यासह पारित करण्यात येत आहे.

**स्थळ** :- पुणे.

दिनांक :- २२/०८/२०२३.

झोपडपट्टी पुनर्वसन प्राधिकरण स्थापना ३०/६/२००५ पुणे

22.8.2023

नीलेश र. गटणे, (भा.प्र.से.)
मुख्य कार्यकारी अधिकारी,
झोपडपट्टी पुनर्वसन प्राधिकरण,

पुणे व पिंपरी चिंचवड क्षेत्र, पुणे.

प्रत :- **रजि. पोस्ट द्वारे - तळईवस्ती , गुरुवार पेठ, पुणे येथील झोपडपट्टी पुनर्वसन क्षेत्र घोषीत करण्याच्या संदर्भातील कलम ३ क ची प्राथमिक अधिसूचना**

१. मा. आयुक्त, पुणे/ पिंपरी चिंचवड महानगरपालिका, पुणे यांना जमीन निमशासकीय मालकीची असल्याने आपले लक्ष महाराष्ट्र झोपडपट्टी (सुधारणा, निर्मुलन व पुनर्विकास) सुधारित अधिनियम २०१७ चे कलम ३ क कडे वेधण्यात येत आहे. उक्त आदेश अंतिम करण्यात आल्यानंतर या क्षेत्रावर झोपडपट्टी पुनर्वसन योजना राबविण्यासाठी आपल्या विभागाच्या वेगळ्या संमती अथवा ना हरकत प्रमाणपत्राची आवश्यकता असणार नाही. खाजगी क्षेत्राचे बाबतीत विकसकाकडे मालकी / विकसन हक्क नसल्यास असे क्षेत्र उक्त अधिनियमामधील प्रकरण पाच मधील तरतूदींन्वये संपादित करण्यात येईल, तसेच अशा शासकीय / निमशासकीय /स्थानिक स्वराज्य संस्थेच्या मालकीची तसेच संपादित करणे आवश्यक असल्यास अशा खाजगी क्षेत्राचा मोबदला उक्त अधिनियमाच्या कलम १७ मधील तरतूदीनुसार निर्धारित करण्यात येईल.

२. मा. जिल्हाधिकारी, पुणे माहिती व आवश्यक कार्यवाहीसाठी.

३. उपजिल्हाधिकारी तथा सक्षम प्राधिकारी क्र १, झोपुप्रा पुणे यांना सूचित करण्यात येते की या अधिसूचनेच्या प्रती योजनाक्षेत्र / झोपडपट्टी क्षेत्रात डकवून प्रसिद्ध करण्यात याव्यात व प्रसिद्धी अहवाल प्रकरणात समाविष्ट करण्यात यावा

४. व्यवस्थापक, मुद्राणालय, येरवडा कारागृह, पुणे-०६

५. विकसक मे.सह्याद्री प्रोपटीज, ११३/५, राम अंजनी ,१४ वी गल्ली, प्रभात रोड, पुणे -४११००४.